IO

# FIRST INFORMATION REPORT
# पहिली खबर

Form : I-A

(Under Section 154 Cr.P.C.)
(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

**No.**

1. *Dist. / जिल्हा: ठाणे *P.S. / पोलीस ठाणे: ठाणेनगर *Year / वर्ष: २०१९ *FIR No. / पहिली खबर क्र.: ४५/१९ *Date / तारीख: १५/०२/१९

2. (i) *Act / अधिनियम: लाचलुचपत प्रतिबंध *Sections / कलमे: ७ प्रमाणे
(ii) *Act / अधिनियम: अधिनियम १९८८ चे *Sections / कलमे: —
(iii) *Act / अधिनियम: (संशोधन २०१८) *Sections / कलमे: —
(iv) *Other Acts & Sections / इतर अधिनियम व कलमे: —

3. (a) Occurance of Offence / अपराधाची घटना: *Day / वार: मंगळवार *Date From / तारीख पासून: १२/०२/१९ *Date To / पर्यंत: —
*Time Period / वेळेचा अवधी: *Time From / पासून: १९.४५ *Time To / पर्यंत: —
(b) Information received at P.S. Date / पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख: १५/०२/२०१९ *Time / वेळ: १६:३५
(c) General Diary Reference Entry No(s) / सर्व साधारण रोजनिशीचा संदर्भ क्र.: २९ *Time / वेळ: १६:३५

4. Type of Information / माहितीचा प्रकार: लेखी *Written / Oral / लेखी/तोंडी: लेखी

5. Place of Occurance / घटनेचे ठिकाण: (a) *Direction and Distance from P.S. / पोलीस ठाणे पासून दिशा व अंतर: ३ कि.मी. Beat No. / गस्तक्षेत्र क्र.:
(b) *Address / पत्ता: V.I.P. कॉग हुक्कासमोर स्टेशन रोड सॅटिस ब्रिज रोडवर ठाणे
(c) In case outside limit of this Police Station, then the / या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव
Name of P.S. / पोलीस ठाणे: — Dist. / जिल्हा: —

6. Complainant / Informant / तक्रारदार / खबरी:
(a) Name / नांव: अश्फाक अहमद शेख
(b) Father's / Husband's Name / पित्याचे/पतीचे नांव: अहमद शेख
(c) Date / Year of Birth / जन्म तारीख / वर्ष: २८ वर्षे (d) Nationality / राष्ट्रीयत्व: भारतीय
(e) Passport No. / पारपत्र क्र.: — Date of Issue / दिल्याची तारीख: — Place of Issue / दिल्याचे ठिकाण: —
(f) Occupation / व्यवसाय: रिक्षा चालक
(g) Address / पत्ता: क्रांतीनगर चाळ, गल्ली नं-१४ II राबोडी सरस्वती शाळेजवळ ठाणे

Scanned by CamScanner

फिर्याद दिनांक : १५/०२/२०१९

मी, अफजल अहमद शेख, वय २८ वर्षे, धंदा—रिक्षा चालविणे, रा.क्रांतीनगर चाळ, गल्ली नं.१४, दुसरी राबोडी, सरस्वती शाळेजवळ, ठाणे प. जि.ठाणे ४००६०१ मो.नं. ७०२१४७१४१४ असा असून फिर्याद देतो की,

मी, वरील प्रमाणे असून जन्मापासून माझे कुटूंबासह वरील पत्त्यावर राहवयास आहे. मी रिक्षा नं. एम एच ०४ जी एन ०८१२ ठाणे शहरात चालवून आपले कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

मी दिनांक १२/०२/२०१९ रोजी नेहमीप्रमाणे संध्याकाळी चार वाजता रिक्षा घरातून काढून, मीटरप्रमाणे ठाणेशहरात कोणत्याही ठिकाणी प्रवाशांच्या सांगणेप्रमाणे ने—आण करीत होतो. असे करीत असताना, माजिवडा नाका येथून प्रवासी घेऊन ठाणे स्टेशन पश्चिम या ठिकाणी मिटरप्रमाणे रिक्षाने घेऊन जात असताना, सुमारे १९.५० ते २०.०० वा.चे दरम्यान रिक्षातील प्रवासी व्ही.आय.पी.बॅगेचे दुकानाजवळ उतरल्यानंतर, लगेचच थोडया अंतरावर पांढ—या रंगातील युनिफॉम मधील ट्रॉफीकचे पोलीस यांनी माझे रिक्षाचे लायसन्स नं.एम एच ०४ २०१०००५५७२१ हे त्यांनी ताब्यात घेतले व सिव्हील कपडे घातलेल्या गिरीश नामे पोलीसाकडे लायसन्स दिले.

त्यानंतर गिरीश नामे पोलीसाने " माझेकडे १००/—रुपये दे, आणि निघुन जा. असे बोलला." त्यावेळी मी त्यांना कशाबद्दल असे विचारले. त्यावेळेस ट्रॉफीकचा युनिफॉर्म घातलेल्या पोलीसाने मी रिक्षासाठी असलेला ड्रेसकोड मधील म्हणजेच संपूर्ण पांढऱ्या रंगाचा ड्रेस मधील केवळ पांढरा शर्ट घातला असल्याने, परंतु पॅन्ट वेगळी असल्याने, त्याबाबतचा दंड असल्याबाबत सांगितले.

त्यानंतर मी गिरीश नामे पोलीसाकडे गेलो व " साहेब, आपण शंभर रुपये मागत आहात तरी माझेकडे आता शंभर रुपये नसून, फक्त चाळीस—पन्नास रुपये आहेत असे बोललो." त्यानंतर मी लगेचच माझेकडील मोबाइल mi redmi 4 हया मोबाईल फोनमधील यापूर्वीच डाउनलोड केलेले background video recording application त्यावेळेस मी चालू केले. त्यावेळी गिरीश नामे पोलीसाने मला दोनशेची पावती होईल, त्यापेक्षा शंभर रुपये दे आणि निघुन जा असे बोलला. सदरचे संपूर्ण व्हिडीओ—ऑडीओ रेकॉर्डीग मी केलेले आहे. तसेच " साहेब, मला जावू दे, माझेकडे आता शंभर रुपये नसून, फक्त पन्नास रुपये आहेत" असे बोलून पन्नास रुपये गिरीश नामे पोलीसाकडे दिले. त्यावेळेस त्याने माझे नाव विचारुन लायसन्स मला परत दिले. त्यानंतर मी त्या पोलीसाकडे नाव व युनिट विचारले, त्यावेळेस त्यांनी त्यांचे नाव "गिरीश" असे बोलून, ठाणेनगर युनिट असल्याबाबत सांगितले. त्यावेळेस मला त्याचे नाव गिरीश असल्याचे समजले आहे.

मला कायदेशीर पावती न देता, गैरमार्गाने पैशाची मागणी केलेला, माझेसोबत घडलेला वर नमूद प्रकार मी माझ्या मोबाईलमध्ये रेकॉर्डीग केलेला आहे. त्यानंतर माझेकडे गैरमार्गाने पन्नास रुपये लाचेची रक्कम घेतल्याने, तसेच कोणतीही कायदेशीर पावती न दिल्याने, सदर पोलीस कर्मचारी गिरीश यांचे विरुध्द अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे लेखी तक्रार दिली.

तसेच त्यावेळी पोलीस कर्मचारी गिरीश अहिरराव यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबतचे व्हिडीओ—ऑडीओ रेकॉर्डिंग क्लीप मी माझे मोबाईलवर केली होती. परंतु माझे मोबाईलमध्ये व्यवसायाच्या दृष्टीने अत्यावश्यक माहिती त्यामध्ये असल्याने, मोबाईलमधील मी केलेला व्हिडीओ, स्वत: लॅपटॉप मध्ये कॉपी केले. त्यानंतर लॅपटॉपमधील कॉपी झालेली व्हिडीओ—ऑडीओ क्लीप, माझेकडील रिकामे असलेले ४ जीबी क्षमतेचे moserbaer कंपनीचे लालरंगाचे पेनड्राईव्हमध्ये कॉपी करुन दिले आहे. सदरचा पेनड्राईव्ह मी हजर केल्यानंतर, तो दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करून पोलीस निरीक्षक श्री.प्रजापती यांनी ताब्यात घेतला आहे.

तरी, दिनांक १२/०२/२०१९ रोजी १९.५८ वा.ठाणे पश्चिम येथील व्हि.आय.पी.बॅगेचे दुकानाचे समोर रोडवर केलेल्या व्हिडीओ—ऑडीओ रेकॉर्डिगमध्ये पोलीस कर्मचारी गिरीश अहिरराव, नेमणूक ठाणे नगर युनिट, ठाणे शहर वाहतुक शाखा, ठाणे जि.ठाणे यांनी माझेकडे रिक्षा चालविण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून पारित केलेल्या पांढ—या रंगाचा ड्रेसकोड मधील पांढरी पॅन्ट परिधान केली नसल्याने, त्याबाबत पन्नास रूपये लाचेची रक्कम कोणतीही कायदेशीर पावती न देता, स्विकारली. अशाप्रकारे पोलीस कर्मचारी गिरीश यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग केल्याने, त्यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

(मनोजकुमार प्रजापती)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

( अफजल अहमद शेख )

Scanned by CamScanner

7. Details of known / suspected / unknwon accused with full particulars :
माहित असलेल्या / संशयीत / माहित नसलेल्या आरोपींचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet if necessary)
आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा

**No.**

पोलिस कर्मचारी गिरीश अहिरराव नेमणूक-ठाणेनगर युनिट ठाणे शहर वाहतूक शाखा ठाणे जि-ठाणे.

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयीतांची शारीरीक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex<br>लिंग | *Date/Year of Birth<br>जन्मतारीख/वर्ष | *Build<br>बांधा | *Height in Cms.<br>उंची (सें.मी. मध्ये) | *Complexion<br>वर्ण | *Identification Mark(s)<br>ओळख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| — | — | — | — | — | — |

| *Deformities/Peculiarities<br>व्यंग/वैशिष्ठ्ये | *Teeth<br>दात | *Hair<br>केस | *Eye<br>डोळे | *Habit(s)<br>सवयी | *Dress Habits<br>पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| — | — | — | — | — | — |

| *Languages /Dialect<br>भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark<br>भाजल्याची खूण | *Leucoderma<br>कोड | *Mole<br>तीळ | *Scar<br>व्रण | *Tattoo<br>गोंदण |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| — | — | — | — | — | — |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I.O.
जर तक्रारदार/खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.

A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यांतील सहभाग स्पष्ट करेल.

Scanned by CamScanner

**No.**

8. Reasons for delay in reporting by the Complainant / Informant :
तक्रारदाराने / खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

.................................... तात्काळ ....................................

..................................................................................

..................................................................................

9. Particulars of properties stolen / involved (Attach separate sheet if necessary) :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) :

.................................... — ....................................

.................................... — ....................................

.................................... — ....................................

10. *Total value of properties stolen / involved :.................. — ....................
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report / U.D. Case No., if any :.................. — ....................
मरणान्वेषण अहवाल/ यु.डी. प्रकरण क्र., जर असल्यास :

12. F.I.R. Contents (Attach separate sheets, if required) :
पहिल्या खबरीतील हकिकत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत) :

ता.म.वेळी व जागी यातील आरोपी "मे" यांनी फिर्यादी यांनी रिक्षा
चालविण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे पारित केलेल्या परवान्या-
च्या रेकॉर्ड मधील पोहरी पेन्ड पाधान्य केले असल्याने त्याबाबत पैसाचे
रूपये कोणतीही रक्कम कोणतीही कायदेशीर पावती न देता स्विकारून त्यांना
मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग केला म्हणून गुन्हा.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2., registered the case and took up the investigation/directed*.............................................
.............................................Rank.............................................to take up the investigation/Refused investigation/transferred to P.S.............................................on point of jurisdiction.

केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरून दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले...मनोज प्रजापति.............................................
पदनाम...पो.हि./ॲन्टी करप्शन...यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर...ठाणे ठाणे.............................................पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला / खबरीला प्रत मोफत दिली.

[signature]

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रारदाराची / खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

[signature]

Signature of ~~the Office-in~~-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सह

*Name :...टी. एन. वाकडे...
नांव

*Rank :...PSI... *No. :...............
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court :.............................................
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

Scanned by CamScanner